# महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक ३ ] मंगळवार, मार्च २४, २००९/चैत्र ३, शके १९३१ [ पृष्ठे २, किंमत रुपये १८.००

**असाधारण क्रमांक १६**

**प्राधिकृत प्रकाशन**


**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.**—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम .. .. .. .. | १-२ |


दिनांक २३ मार्च २००९ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २४ मार्च २००९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६६ चा महा. ४१. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी २००९ चा महा. अध्या. २. दिनांक २४ फेब्रुवारी २००९ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २००९ प्रख्यापित केला होता ;

**आणि, ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या साठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २००९ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २४ फेब्रुवारी २००९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३१४ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३१४ मध्ये, " औरंगाबाद " या मजकुरानंतर, " , पुणे " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. १९६६ चा महा. ४१.

सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २००९ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २००९ चा महा. अध्या. २.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारित करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदीं अन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा यथास्थिति, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक ५]   मंगळवार, मार्च २४, २००९/चैत्र ३, शके १९३१   [पृष्ठे २, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्र. २०

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause *(3)* of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Act, 2009 (Mah. Act No. X of 2009) is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. X OF 2009

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 24th March 2009).*

An Act further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966, for the purposes hereinafter appearing; and, therefore,

Mah. XLI of 1966.

promulgated the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2009, on the 24th February 2009 ; Mah. Ord. II of 2009.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixtieth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

1. (*1*) This Act may be called the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Act, 2009.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 24th February 2009.

Amendment of section 314 of Mah. XLI of 1966.

2. In section 314 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (hereinafter referred to as "the principal Act"), after the word "Aurangabad" the word ", Pune" shall be inserted. Mah. XLI of 1966.

Repeal of Mah. Ord. II of 2009 and saving.

3. (*1*) The Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2009, is hereby repealed. Mah. Ord. II of 2009.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done or taken, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.